मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भाजपसोबत गेलेल्या संधीसाधूंना सोबत घेऊ शकत नाही

## पिंपरी-चिंचवडमधील एका कार्यक्रमात शरद पवारांचं मोठं विधान; युतीच्या चर्चेला ब्रेक?



**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मंगळवारी (17 जून 2025) पिंपरी-चिंचवडमधील एका कार्यक्रमात अजित पवार यांच्या गटाला लक्ष्य करत धक्कादायक वक्तव्य केले. “सत्तेसाठी भाजपसोबत (BJP) गेलेल्या संधीसाधूंना आपण सोबत घेऊ शकत नाही.

गांधी, नेहरू, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचे लोक सोबत घेऊ, पण काँग्रेसचा विचार भाजपशी सुसंगत नाही,” असे पवार म्हणाले. या वक्तव्यामुळे अजित पवार गटासोबतच्या युतीच्या चर्चांना ब्रेक लागला असून, पक्षांतर्गत एकसंघतेच्या आशांवर पाणी फिरले आहे.

शरद पवार यांनी आगामी महापालिका निवडणुकीसाठी नव्या नेतृत्वाची फळी तयार करण्यावर भर दिला. “विकास असा करायचा की भावी पिढी प्रेरित व्हावी. जे गेले त्यांची चिंता करू नका. माझ्या कारकिर्दीत अनेकांनी साथ सोडली, पण कार्यकर्त्यांच्या पाठिंब्याने मी सत्तेत परतलो.

लोकशाही जनतेच्या शहाणपणाने टिकली आहे आणि ती पुढेही टिकेल,” असे ते म्हणाले. त्यांनी कार्यकर्त्यांना धीर देत, “निवडणुकीची काळजी करू नका. जो आपल्या विचारांशी जोडला असेल, त्याला संधी मिळेल,” असे आश्वासन दिले.

**जुनी अनधिकृत बांधकाम टिकायला हवीत**

रांजणगावला ही आम्ही औद्योगिक नगरी बनवलं. चाकण, बारामती, इंदापूर, अशा अनेक ठिकाणी औद्योगिक पट्टा निर्माण केला. पिंपरी चिंचवडच्या आजूबाजूला हे औद्योगिक आणण्यासाठी आम्ही झटलो. आज स्थिती वेगळी आहे. आता इथलं राजकारण, समाजकारण बदललं आहे. इथलं नेतृत्व अण्णासाहेब मगर, मग आम्ही, त्यानंतर रामकृष्ण मोरे यांनी या शहराचा चेहरा बदलण्यासाठी कष्ट घेतले. यामागे गांधी-नेहरूंचे विचार महत्वाचे ठरले. त्यांनी विकासाची गंगा आणली अन हीच विकासाची गाडी आपल्याला पुढं न्यायची आहे.

### पिंपरी-चिंचवडचा विकास आणि प्रदूषण

» पिंपरी-चिंचवडच्या औद्योगिक प्रगतीवर बोलताना पवार म्हणाले, “यशवंतराव चव्हाण, अण्णासाहेब मगर आणि रामकृष्ण मोरे यांनी या शहराचा चेहरा बदलला. रांजणगाव, चाकण, बारामती येथे औद्योगिक पट्टे निर्माण केले. पण आता प्रदूषण आणि नद्यांवरील फेस हे चिंतेचे विषय आहेत. हे प्रश्न फक्त राष्ट्रवादी सोडवू शकते.” तसेच, “जुनी अनधिकृत बांधकामे टिकायला हवीत, पण नवीन होऊ देऊ नका. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाढणारा व्यवसाय स्वच्छ करावा लागेल,” असेही त्यांनी सुचवले. या वक्तव्यांनी पिंपरी-चिंचवडमधील राजकीय वातावरण तापले असून, अजित पवार गट आणि शरद पवार यांच्यातील दरी आणखी वाढल्याचे स्पष्ट झाले आहे.

# कुदळवाडीतील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी बैठक संपन्न

## गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अनियमित व अपुरा पाणी पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त



**पिंपरी | प्रतिनिधी**

कुदळवाडीतील बालघरे वस्ती येथे पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी प्रितम बाविस्कर आणि स्थानिक लोकप्रतिनिधी दिनेश यादव यांच्या उपस्थितीत एक महत्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली.

या भागात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अनियमित व अपुरा पाणी पुरवठ्यामुळे नागरिक, विशेषतः महिलावर्ग, त्रस्त झाला होता. त्यामुळे समस्या समजून घेण्यासाठी आणि तातडीने उपाययोजना करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस मोठ्या संख्येने महिला नागरिक उपस्थित होत्या. त्यांनी थेट अधिकाऱ्यांपुढे आपल्याला भेडसावणाऱ्या समस्या स्पष्टपणे मांडल्या. यामध्ये वेळेवर पाणी न मिळणे, कमी दाबाने येणारे पाणी, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, तसेच टँकर सेवा असमाधानकारक असणे यासारख्या गंभीर मुद्द्यांचा समावेश होता.

अधिकारी प्रितम बाविस्कर यांनी महिलांच्या सर्व तक्रारी लक्षपूर्वक ऐकून घेतल्या आणि तात्काळ उपाययोजना केली जातील, असे आश्वासन दिले. लोकप्रतिनिधी दिनेश यादव यांनी प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवादाचे महत्त्व अधोरेखित केले आणि भविष्यात अशा संवादात्मक बैठका अधिक नियमितपणे घेण्याचे आश्वासन दिले. बैठक सकारात्मक वातावरणात पार पडली आणि त्यातून प्रशासन व नागरिकांमधील परस्पर विश्वास अधिक दृढ झाला.

### बैठकीतील प्रमुख मुद्दे:

» नियमित व वेळेवर पाणी पुरवठा.
» वारंवार होणाऱ्या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय.
» पाईपलाइनमधील बिघाडाचे तत्काळ निराकरण.
» पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी व उपाय.

# पुणे शहरात 13 ठिकाणी झाडे पडली

## शहरात झालेल्या पावसामुळे 13 ठिकाणी झाडे पडल्याची घटना घडल्या

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात झालेल्या पावसामुळे १३ ठिकाणी झाडे पडल्याची घटना घडल्या. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन फांद्या हटवून रस्ते वाहतुकीस खुले करून दिले. शहर परिसरात मध्यरात्रीनंतर जोरदार पाऊस झाला. त्यानंतर सोमवारी दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. मध्यरात्रीनंतर शहराच्या वेगवेगळ्या भागात झाडे, तसेच फांद्या पडण्याच्या घटना घडल्या.



सोमवारी सायंकाळपर्यंत १३ ठिकामी झाडे पडल्याची माहिती अग्निशमन दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाने दिली. प्रभात रस्ता गल्ली क्रमांक १४, पाषाण रस्त्यावरील अभिमानश्री सोसायटी, पाषाण परिसरातील सोमेश्वरवाडी, बालेवाडीतील श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल, कोथरूडमधील महात्मा सोसायटी, सिंहगड रस्त्यावरील नित्यानंद हॉल, सोमवार पेठेतील नरपतगिरी चौक, महापालिका भवन, घोरपडीतील सोपानबाग, बिबवेवाडीतील हॉटेल रुपाली, खराडीतील ठुबेनगर, कोथरूडमधील रामबाग कॉलनी परिसरात झाड कोसळण्याच्या घटना घडल्या. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.

### जुन्या वाड्याची भिंत कोसळली

» मध्यभागातील फडके हौद चौक परिसरातील जुन्या वाड्याची भिंत कोसळण्याची घटना घडली, तसेच सिंहगड रस्त्यावरील धायरी परिसरात एक जाहिरात फलक कोसळला. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य केले.

# हिंजवडी आयटी पार्कमध्ये पुन्हा पाहणी, पुन्हा आदेश!

## आयटी पार्कमधील समस्यांबाबत शासकीय यंत्रणांची सोमवारी संयुक्त बैठक झाली

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्कमधील समस्या सोडविण्यासाठी शासकीय यंत्रणांनी गेल्या आठवड्यात संयुक्त पाहणी करून बैठक घेतली. या बैठकीत १५ जूनपर्यंत उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. आता ही मुदत संपल्यानंतर सोमवारी शासकीय यंत्रणांनी पुन्हा आयटी पार्कची पाहणी केली. यानंतर उपाययोजनांचे निर्देशही पुन्हा दिले आहेत. यामुळे शासकीय यंत्रणांकडून प्रत्यक्षात उपाययोजना कधी सुरू होणार, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

आयटी पार्कमधील नागरी समस्या सोडविण्यासाठी गेल्या आठवड्यात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासह (एमआयडीसी) इतर शासकीय यंत्रणांकडून पाहणी करण्यात आली. त्यानंतर झालेल्या बैठकीत 'पीएमआरडीए'चे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी शासकीय यंत्रणांची संयुक्त बैठक घेऊन उपाययोजना करण्यासाठी १५ जूनची मुदत दिली. ही मुदत संपल्यानंतर पुन्हा सोमवारी पीएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, 'एमआयडीसी'चे सहमुख्य कार्यकारी अधिकारी विजय राठोड यांनी अधिकाऱ्यांसह आयटी पार्कची संयुक्त पाहणी केली.

या पाहणीनंतर हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशनमध्ये या अधिकाऱ्यांनी विविध शासकीय यंत्रणांची संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत आयटी पार्कमधील टप्पा एक, दोन आणि तीन तसेच मेट्रो मार्गासह परिसरातील पावसाळी पाण्याचा निचरा, रस्ते दुरुस्ती आणि नागरी सुविधांबाबत उपाययोजनांचे निर्देश देण्यात आले.

### आयटी पार्कमधील प्रमुख उपाययोजना

पावसाच्या पाण्याचा निचरा : डॉल्फिन आणि साई प्रोविजो इमारतीजवळ पावसाळी पाण्याचा निचरा करण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या जाणार.

राडारोडा व्यवस्थापन : मेट्रो मार्गासह परिसरात पडलेला राडारोडा त्वरित हटवून योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याचे निर्देश.

प्रदूषणविरोधी कारवाई : नैसर्गिक नाल्यात प्रदूषित पाणी सोडणाऱ्या कंपन्यांवर कडक कारवाईसाठी आदेश.

नैसर्गिक नाले खुले करावेत : बंद केलेले नैसर्गिक नाले खुले करत मार्गातील राडारोडा दूर करावा. सांडपाणी वाहिन्यांची स्वच्छता आणि दुरुस्तीचे आदेश.



> आयटी पार्कमधील नागरी सुविधांबाबत प्रत्येक शासकीय विभागावर स्वतंत्रपणे जबाबदारी देण्यात आली. सध्या सुरू असलेल्या उपाययोजनांचा आढावा संयुक्त पाहणी आणि बैठकांच्या माध्यमातून घेण्यात येत आहे. या प्रकरणी येत्या बुधवारी आढावा बैठक घेऊन आयटी पार्कमध्ये केलेल्या उपाययोजनांचा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्यात येणार आहे.
> - डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.

> आयटी पार्कमधील पावसाच्या पाण्याचा निचरा व्हावा, यासाठी एमआयडीसीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. काही ठिकाणी सांडपाणी वाहिन्या बसविण्यात आल्या आहेत. याचबरोबर पावसाच्या पाण्याच्या प्रवाहास अडथळा निर्माण करणाऱ्या दोन बांधकाम प्रकल्पांना काम थांबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
> - नितीन वानखेडे, मुख्य अभियंता, एमआयडीसी.

# कुंडमळा पूल दुर्घटनेप्रकरणी पोलिसांकडून कसून तपास

## उपस्थितांचे जबाब नोंदवण्याची प्रक्रिया सुरू; चौघांची अकस्मात मृत्यूची नोंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळेगावजवळील कुंडमळा येथे रविवारी (दि. 15) इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेचा तळेगाव दाभाडे पोलिस कसून तपास करीत आहेत. या प्रकरणात आत्तापर्यंत चौघांच्या अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, उपस्थित लोकांचे जबाब नोंदवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.



दुर्घटनास्थळी रविवारी दुपारी तीनच्या सुमारास भर गर्दीत पूल कोसळला होता. या दुर्घटनेत चार पर्यटकांचा मृत्यू झाला असून, 50 पेक्षा अधिक जखमी आहेत. काहींची प्रकृती गंभीर असल्याने अजूनही काही नागरिकांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांकडून अद्याप अपूर्ण असलेली बेपत्ता यादीही पुन्हा पडताळून घेतली जात आहे.

दरम्यान, दुर्घटनेनंतर उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आलेल्या 35 जखमींना सोमवारी (दि. 16) प्राथमिक उपचारानंतर घरी सोडण्यात आले असून, 15 जणांवर उपचार सुरू आहेत. जखमी झालेल्या पर्यटकांपैकी 11 जणांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

तळेगाव दाभाडे पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा, मृतांची ओळख पटविणे, आणि जखमी व साक्षीदारांच्या प्राथमिक जबाबांची नोंद घेण्यास सुरुवात केली आहे. सध्या या प्रकरणात 'अकस्मात मृत्यू'ची नोंद घेण्यात आली आहे.

पोलिसांकडून घटनास्थळी उपस्थित असलेल्या स्थानिक ग्रामस्थ, पर्यटक, आणि व्यावसायिकांचे सखोल जबाब घेतले जात आहेत. त्याचबरोबर, घटनास्थळी मोबाईलमध्ये कैद झालेली व्हिडीओ क्लिप, फोटो, व सीसीटीव्ही फुटेज यांचाही तपास सुरू आहे.

पोलिस तपासाचा एक भाग म्हणून, या पुलाविषयी ग्रामपंचायत व संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने यापूर्वी दिलेल्या सूचनांच्या नोंदी मागविण्यात आल्या आहेत. पूल जुना असूनही त्यावर नियंत्रणासाठी कोणती खबरदारी घेण्यात आली होती का, त्यासाठी शासकीय विभाग जबाबदार धरले जाईल का, याचीही चाचपणी सुरू आहे.

### ग्रामपंचायतीने दिला होता इशारा

» ग्रामपंचायतीने 'पूल धोकादायक आहे, वाहनांसाठी वापर न करता फक्त पादचाऱ्यांसाठीच वापर करावा' अशी सूचना दिली होती, अशी माहिती तपासात समोर आली आहे. मात्र, प्रत्यक्षात दुचाकींसह मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ या पुलावर सुरू होती.

### पुरावे गोळा आणि अहवाल प्रक्रिया

» पोलिसांकडून सध्या मृत व्यक्तींच्या शवविच्छेदन अहवाल, जखमींनी दिलेल्या अधिकृत जबाब, आणि घटनास्थळी उपस्थित स्वयंसेवक, व्यापारी, व स्थानिक प्रतिनिधींचे सविस्तर निवेदन गोळा केले जात आहे. तसेच घटनेच्या वेळेचा व्हिडीओ पुरावा, मोबाईल फुटेज आणि सोशल मीडियावरील पोस्ट्स यांचादेखील फॉरेन्सिक दृष्टीने अभ्यास सुरू आहे.

“ दुर्घटनेनंतर लगेचच तपास प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. उपस्थितांचे जबाब घेण्याचे काम सुरू आहे. सर्व शक्यता गृहीत धरून तपास सुरू आहे. तसेच, सोमवारी दिवसभर शोधमोहीमदेखील राबवण्यात आली आहे.

**- प्रदीप रायन्नवर, वरिष्ठ निरीक्षक, पिंपरी-चिंचवड.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये तीन उड्डाणपूल धोकादायक

## दापोडीचा हॅरिस ब्रिज, पिंपरीचा इंदिरा गांधी पूल आणि चिंचवड स्टेशन येथे दुरुस्ती सुरु

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिकेचा पिंपरीतील इंदिरा गांधी उड्डाणपूल आणि चिंचवड स्टेशनचा रेल्वे उड्डाणपूल धोकादायक स्थितीत असून त्या पुलाची महानगरपालिकेकडून डागडुजी करुन सुरु केले आहेत. तर ब्रिटीश कालीन दापोडीतील हॅरिस ब्रिज देखील बंद करण्याची स्थिती होती. त्यावर देखील देखभाल दुरुस्ती करुन सुरु आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील तीन पुलाची स्थिती धोकादायक होती. परंतू, त्यावर महानगरपालिकेकडून करोडो रुपये खर्च करुन दुरुस्ती करत वाहतूकीस सुरु केले आहे. तर चिंचवड स्टेशनचा उड्डाणपूल हा अवजड वाहतूकीस बंद करण्यात आलेला आहे.

पिंपरी गावाला जोडणा-या इंदिरा गांधी उड्डाणपूल आणि चिंचवड स्टेशन हे दोन्ही रेल्वे मार्गावरील उड्डाणपूल हे कालबाह्य झाले आहेत. महापालिकेने या दोन्ही उड्डाणपूलाची तात्पुरती दुरुस्ती देखील केली होती. तरीही हे दोन्ही उड्डाणपूल धोकादायक बनले असून त्या पुलाचे आयुष्य संपले आहे. त्यामुळे हे दोन्ही उड्डाणपूल तात्काळ पाडण्यात यावे, जेणे करुन भविष्यातील अपघात टाळण्यात येईल, असे पत्र रेल्वे विभागाकडून पिंपरी-चिंचवड महापालिकेला देण्यात आले आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरीगाव, मार्केट येथील इंदिरा गांधी उड्डाणपुल खुप जीर्ण झाला आहे. तसेच, चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई जुन्या महामार्ग व चिंचवड गावाला जोडणाऱ्या उड्डाणपुल देखील कालबाह्य झाला आहे. रेल्वे मार्गावरील दोन्ही उड्डाणपूल तात्काळ पाडण्यात यावेत, याकरिता रेल्वे विभागाकडून पिंपरी-चिंचवड महापालिकेला पत्र देवून पाठपुरावा सुरु आहे. परंतू, हे उड्डाणपूल पाडल्यास पिंपरी आणि चिंचवड गावाकडे जाणारी वाहतूक कोणत्या मार्गाने सोडायची, असा प्रश्न महापालिकेच्या अधिका-यांना पडला आहे.

पुणे-मुंबई जुन्या महामार्ग आणि पिंपरी गावास जोडणारा पुणे-लोणावळा लोहमार्गावरील पिंपरी येथील इंदिरा गांधी उड्डाण पुल हा शहरातील सर्वात पहिला पुल आहे. या उड्डाण पुलाचे आयुष्य संपले आहे. सगळे बांधकाम धोकादायक झाले आहे. तो पुल वाहतुकीस बंद करा. पुल पाडून टाका, असे पत्र रेल्वे विभागाने महापालिकेस तत्कालिन आयुक्त श्रावण हर्डिकर यांच्या कार्यकाळात पाठविले होते.

शहरातील दोन भागांना जोडणारा हा महत्वाचा पुल असल्याने महापालिकेने पुलाचे स्ट्रॅक्टर ऑडिट केले. त्यानंतर त्यांचे मजबुतीकरण करण्यात आले. हे काम सुमारे 2 ते 3 वर्षे सुरू होते. त्यावर उड्डाणपुल दुरुस्तीसाठी कोट्यावधी रुपये खर्च करण्यात आला. त्यानंतर पिंपरीच्या उड्डाणपूलाचे मजबूतीकरण करण्यात आले आहे.

तसेच, शहरातील चिंचवड स्टेशन येथील लोहमार्गावरील उड्डाण पुलाच्या बांधकामास 47 वर्षे झाले आहेत. ते बांधकाम धोकादायक झाले असून, तो पुल पाडा, असे पत्र रेल्वेने महापालिकेस नुकतेच पाठविले आहे.

### सर्वच पुलाचे होणार स्ट्रक्चरल ऑडिट

» शहरातील नदीवरील पुलांप्रमाणेच आता नाले, ओढे, तसेच कालव्यांवर बांधण्यात आलेल्या पुलांचेही स्थापत्य लेखापरीक्षण (स्ट्रक्टरल ऑडिट) करण्यात येणार आहे. शहरातून वाहणाऱ्या नदीवर जागोजागी पूल बांधण्यात आलेले आहेत. या पुलांवरून वाहतूक होत असल्याने ते वापरण्यास योग्य आहेत की नाही, याची तपासणी करण्यासाठी महापालिकेने या पुलांचे स्थापत्य लेखापरीक्षण करण्याचा निर्णय यापूर्वीच घेतला आहे. त्यानुसार कामही सुरू करण्यात आले आहे.

# शहरातील धोकादायक झाडांची छाटणी सुरू

## गेल्या दोन महिन्यांत 748 ठिकाणच्या फांद्या कापल्याचा महापालिकेचा दावा

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील धोकादायक झालेली झाडे, फांद्या तोडण्यासाठी नागरिकांनी दिलेले ३०९ अर्ज मंजूर करण्यात आले असून, आता शहरातील खासगी सोसायटीच्या आवारातील धोकादायक झाड अथवा फांद्या आढळल्यास महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून कापण्यात येणार आहेत. मात्र, त्या कामाचा खर्च संबंधित सोसायटीकडून वसूल केला जाणार आहे.



दरम्यान, गेल्या दोन महिन्यांत उद्यान विभागाने शहरातील विविध भागांत ७४८ ठिकाणी कामे करण्यात आल्याचा दावा महापालिकेने केला आहे. पावसाला सुरुवात होण्यापूर्वी धोकादायक झाडे, फांद्या काढून टाकण्याचे आदेश महापालिका आयुक्तांसह अतिरिक्त आयुक्तांनी दिले. त्यासाठी विविध विभागांसह उद्यान विभागातील कर्मचारी, अधिकारी यांच्या बैठका देखील घेण्यात आल्या. मात्र त्यानंतरही धोकादायक फांद्या तोडण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले. पावसामुळे नीलायम चित्रपटगृह आणि एरंडवणा परिसरात धोकादायक झालेल्या झाडांच्या फांद्या पडल्याने दोन जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर महापालिकेकडे आलेल्या तक्रारींची आणि प्रस्तावांची दखल घेऊन उद्यान विभागाने सर्व अर्ज निकाली काढले आहेत.

> “पावसाळ्यात धोकादायक झालेल्या फांद्या आणि झाडे आढळल्यास ती काढून टाकण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या आहेत. खासगी सोसायटीच्या आवारातील धोकादायक झाड, फांद्या आढळल्यास महापालिकेने त्याकडे लक्ष देऊन ते कापून टाकावे. त्या कामाचे बिल संबंधित सोसायटीकडून वसूल करावे, अशा सूचना दिल्या आहेत.
>
> **- ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.**

पूर्वी धोकादायक झाडे, फांद्या कापण्याची किंवा छाटण्याची परवानगी उद्यान विभागाच्या वृक्ष प्राधिकरण समितीकडून दिली जात होती. त्यामुळे अनेक कामे रखडत होती. महत्त्वाच्या प्रकल्पांनाही याचा फटका बसत होता. त्यामुळे आता धोकादायक झाडे, फांद्या तोडण्याचा परवाना देण्याच्या कामाचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. हे अधिकार क्षेत्रीय कार्यालयांच्या स्तरावरील समितीला देण्यात आले आहेत. मात्र, विकेंद्रीकरण करूनही अनेक प्रस्ताव रखडत असल्याच्या तक्रारी अतिरिक्त आयुक्त कार्यालयांकडे आल्या होत्या. दोन जणांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्यानंतर उद्यान विभागाच्या कारभारावर टीका झाली. त्यानंतर उद्यान विभागाने प्रलंबित असलेल्या सर्व ३०९ प्रस्तावांना मंजुरी दिली आहे. तसेच, महापालिकेच्या वृक्ष छाटणी गाडीने शहरातील ४३९ ठिकाणी धोकादायक फांद्या व झाडांची छाटणी पूर्ण केली आहे. गेल्या दोन महिन्यांत शहरातील ७४८ ठिकाणी ही कामे केल्याचा दावा उद्यान विभागाने केला आहे.

# खडकवासला साखळीत अर्धा टीएमसीची वाढ

## धरणसाखळीत 19.81 टक्के साठा : वरसगावात 35 तासांत 123 मि.मी. पाऊस

**पुणे | प्रतिनिधी**

पानशेत, मुठासह सिंहगड खोऱ्यातील संततधारेने गेल्या 24 तासांत खडकवासला धरणसाखळीत अर्धा टीएमसीपेक्षा अधिक पाण्याची वाढ झाली. सोमवारी (दि. 16) पाच वाजेपर्यंत खडकवासला साखळीतील पाण्याची पातळी 5.77 टीएमसीवर म्हणजे 19.81 टक्क्यावर पोहचली होती, तर रविवारी (15) सकाळी सहा ते सोमवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंतच्या 35 तासांत वरसगावात सर्वाधिक 123 मिलिमीटर पाऊस पडला, तर याच कालावधीत पानशेत येथे 112, टेमघर येथे 105 व खडकवासला येथे 60 मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

सोमवारी सकाळी जोरदार पाऊस पडल्यानंतर दिवसभर रिमझिम सुरू होती. सायंकाळी साडेपाचपासून पुन्हा पानशेत, वरसगाव, टेमघर धरणक्षेत्रात पावसाच्या सरी कोसळू लागल्या. त्यामुळे चारही धरण क्षेत्रातील ओढे, नाले, नद्या दुथडी भरून वाहू लागल्या. पावसाचा जोर कायम राहिल्यास मंगळवारी सकाळपर्यंत धरणसाठ्यात पुन्हा चांगली वाढ होण्याची शक्यता जलसंपदा विभागाने वर्तविली आहे.



**तर खडकवासला 50 टक्के भरण्याची शक्यता**

खडकवासला धरणाचे पाणलोट क्षेत्र सिंहगड खोऱ्यापासून पानशेत, वरसगाव व टेमघर धरणांच्या भिंतीपर्यंत पसरले आहे. खडकवासला धरण माथ्यावर पावसाचे प्रमाण कमी आहे. मात्र, धरण क्षेत्रात संततधार सुरू असल्याने खडकवासलाची पाणीपातळी सोमवारी सायंकाळी पाच वाजता 48.31 टक्क्यावर पोहचली. त्यामुळे रात्रीपर्यंत धरण 50 टक्के भरण्याची शक्यता आहे. धरणसाखळीतील सर्वात मोठ्या वरसगावची पाणीपातळीही जवळपास 25 टक्क्यांवर पोहचली आहे. सायंकाळपर्यंत वरसगावमध्ये 24.16 टक्के, तर पानशेतमध्ये 15.49 व टेमघरमध्ये 1.97 टक्के साठा झाला होता.

**धरणसाखळीत गतवर्षीपेक्षा दोन टीएमसी अधिक पाणीसाठा**

रविवारी सायंकाळी पाच वाजता धरण साखळीत 5.20 टीएमसी पाणी होते. त्यात गेल्या 24 तासांत 0.57 टीएमसीची वाढ होऊन पाणीसाठा 5.77 टीएमसीवर गेला. रविवारी सकाळी सहापासून सोमवारी सकाळी सहापर्यंत टेमघर येथे 80, वरसगाव येथे 93, पानशेत येथे 93 व खडकवासला येथे 47 मिलिमीटर पाऊस पडला. गतवर्षीच्या तुलनेत धरणसाखळीत दोन टीएमसी अधिक पाणीसाठा आहे. गेल्या वर्षी आजच्या दिवशी 16 जून 2024 रोजी धरणसाखळीत 3.80 टीएमसी पाणी होते.